# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि /450/२०१९

दिनांक: 13 /03/२०१९

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी
संलग्नित महाविद्यालये
(चंद्रपुर व गडचिरोली जिल्हा.)

विषय :— विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळविण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पुर्ण करण्याबाबत

संदर्भ :—क्र. उशिसं/शिष्य—२०१८/डीबीटी/२८६७ दिनांक ०१/०३/२०१९
प्राप्त दिनांक ०५/३/२०१९

महोदय

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयांकडुन विद्यापीठाला पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्र सोबत संलग्नित करण्यात येत आहे. महाविद्यालयाने संलग्नित केलेल्या पत्रानुसार कार्यवाही घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठात सादर करावा.

(डॉ. व्ही.सी. सिलारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलंग्नित :— उपरोक्तप्रमाणे

विद्यापीठ, गडचिरोली
कार्यालयीन विभाग
क्र. 2 दिनांक 2/3/19

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

2389 02/03/19

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 2867 दि. ०१/०३/२०१९

तात्काळ अत्यंत महत्वाचे

01 MAR 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

विषय :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्यावाबत....

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या **शिष्यवृत्ती योजनांसाठी, पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे आज अखेरपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.** यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी आज अखेरपर्यंत अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था/ विद्यापीठ यांचेमार्फत कळविण्यात यावे.

२. तसेच, डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्ज शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरुन दि. ०२.०३.२०१९ पर्यंत निकाली काढावेत. कोणत्याही परिस्थितीत संस्था तसेच विभाग स्तरावर अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

३. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जाची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी विनाआधार या पर्यायाचा वापर करुन, महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचे अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन आधार क्रमांक अपडेट करुन घ्यावा. शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना त्यांचे आधार लिंक बँक खात्यामध्ये देण्यात येणार आहे. सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावी.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. यावाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.